"बेटी बचाओ - बेटी पढाओ" या केंद्र शासन पुरस्कृत योजनेसाठी उर्वरीत ५० टक्के निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१५/प्र.क्र.३००/का.६

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २२ जानेवारी, २०१६

वाचा :- १) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१५/प्र.क्र.१९३/का.०६, दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१५
२) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१५/प्र.क्र.३००/का.६, दिनांक ११ जानेवारी, २०१६
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ३ दिनांक १६ जानेवारी, २०१६

प्रस्तावना :- उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये "बेटी बचाओ - बेटी पढाओ" हा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम राज्यातील खालीलप्रमाणे १० जिल्हयात सन २०१४ ते सन २०१७ या कालावधीत राबविण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

अ. क्र.	जिल्हा	मुलांचे लिग गुणोत्तर सन २०११ च्या जनगणनेनुसार
१	बीड	८०७
२	जळगांव	८४२
३	अहमदनगर	८५२
४	बुलढाणा	८५५
५	औरंगाबाद	८५८
६	वाशिम	८६३
७	कोल्हापूर	८६३
८	उस्मानाबाद	८६७
९	सांगली	८६७
१०	जालना	८७०

तसेच उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये सदर योजनेसाठी पुरवणी मागणीद्वारे मंजूर झालेला रु.२,४०,७३,०००/- एवढया तरतूदीपैकी ५०% तरतूद म्हणजेच रु.१,२०,३६,५००/- (अक्षरी रुपये एक कोटी वीस लाख छत्तीस हजार पाचशे फक्त) एवढी तरतूद बीड, जळगांव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली व जालना या जिल्हयांकरिता वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच उपरोक्त संदर्भ क्र.३ येथील वित्त विभागाच्या दिनांक १६/१/२०१६ च्या परिपत्रकान्वये केंद्र पुरस्कृत योजनांसाठीचा १०० टक्के निधी वितरण करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

शासन निर्णय :- बेटी बचाओ-बेटी पढाओ या केंद्र शासन पुरस्कृत योजनेसाठी आता पुरवणी मागणीद्वारे मंजूर झालेला रुपये २,४०,७३,०००/- एवढया तरतूदीपैकी उर्वरीत ५० टक्के तरतूद म्हणजेच रुपये १,२०,३६,५००/- (अक्षरी एक कोटी वीस लाख छत्तीस हजार पाचशे फक्त) एवढी तरतूद बीड, जळगांव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली व जालना या जिल्हयांकरिता वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. बेटी बचाओ-बेटी पढाओ ही योजना आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांच्या कार्यालयामार्फत राबविण्यात येत आहे. त्यामुळे आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदरहू योजनेवर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

"मागणी क्रमांक एक्स-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण, १०३, महिलांचे कल्याण, (२५) मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी योजना, (२५) (०३) बेटी बचाव-बेटी पढाव योजना (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना), (२२३५ बी ४९७) (योजनांतर्गत), २६-जाहिरात व प्रसिध्दी"

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२२१६००२५४८३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vasave Vijesing F

Digitally signed by Vasave Vijesing F
DN: c=IN, o=Govt of Maharashtra, ou=Women and Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vasave Vijesing F
Date: 2016.01.25 14:36:40 +05'30'

(वि. फ. वसावे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई
४) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५) मा. सर्व विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई

१०) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, नवी मुंबई
१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१६) सर्व मंत्रालयीन विभाग
१७) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
१९) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई / नागपूर
२०) सर्व विभागीय आयुक्त
२१) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
२२) **जिल्हाधिकारी,** बीड, जळगांव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली व जालना
२३) **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,** बीड, जळगांव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली व जालना
२४) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग
२५) **जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी**, बीड, जळगांव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली व जालना
२६) **जिल्हा कोषागार अधिकारी**, बीड, जळगांव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली व जालना
२७) **जिल्हा आरोग्य अधिकारी,** बीड, जळगांव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली व जालना
२८) वित्त विभाग/व्यय-६, मंत्रालय, मुंबई
२९) नियोजन विभाग/का.१४७२, मंत्रालय, मुंबई
३०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३१) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
३२) **उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण), जिल्हा परिषद,** बीड, जळगांव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली व जालना
३३) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण / आदिवासी / नागरी)
३४) महिला व बाल विकास विभागातील सर्व कार्यासने
३५) निवड नस्ती (कार्यासन ६).